स्थायी समिती

दाखल विषय – दि. ७/७/२०२०

विषय क्रमांक :– २७९ त्वर्य

मुद्रणमहर्षी मामाराव दाते मुद्रणालयामध्ये कोरोना संसर्गजन्य प्रादुर्भावर रोखण्यासाठी पुणे शहरात घरोघरी सर्व्हेक्षण करण्याकरिता विविध प्रकारचे फॉर्म छपाई करणेकामी मनपा मुद्रणालयात कागद शिल्लक नसल्याने कोरोना संदर्भात संपूर्ण पुणे शहरात घरोघरी सर्व्हेक्षण करण्यासाठी फॉर्म छपाई आवश्यक असल्याने व याकामी टेंडर प्रक्रियेद्वारे खरेदीस दिर्घ कालावधी लागू शकणार असल्याने तातडीच्या कामाकरीता महाराष्ट्र अधिनियम कलम ६७.३ (क) नुसार तातडीची बाब म्हणून मा.महापालिका आयुक्त यांच्या मान्यतेने आवश्यक कागद ६१ सें.मी. (२४") = ६८ gsm पांढरा रिळ पेपर खरेदी करणेकामी स्थानिक बाजारातून कोटेशन मागविले असता पटेल पेपर कंपनी यांचा दर कमी आल्याने त्यांच्याकडून १४७०२ किलो कागद र.रु. ७,९०,३७९/– खरेदी केला असून त्याचे बिल दि.२९/४/२०२० रोजी पटेल पेपर कंपनी यांना अदा केले आहे.

सदरची बाब मा.मुख्य सभेच्या निदर्शनास आणणेबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/मुद्रणालय/१५४ दि.२/७/२०२० चे पत्र.

विषय क्रमांक :– २८० त्वर्य

लोकल पर्चेस अंतर्गत परवानाधारक औषध विक्रेत्याकडून अंशदायी वैद्यकीय सहाय योजनेकरीता दैनंदिन स्वरूपात औषधे व इतर साहित्यांची खरेदी करणे ( टेंडर क्रमांक ९ सन २०२० – २१ ) कामी निविदा मागविण्यात आली असता एकुण तीन निविदाधारकांनी त्यांच्या निविदा सादर केलेल्या असून पात्र दोन निविदाधारकांच्या दरांच्या तक्त्याचे अवलोकन केले असता श्रीराम डिस्ट्रीब्युटस व नरेंद्र मेडिकल्स या दोन निविदाधारकांनी जेनेरीक औषधांच्या व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर **५२.३०%** व **बॅन्डेड** औषधांच्या व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर **२१.६०%** इतका डिस्काउंट (सूट) दर जीएसटी करासहित एकसमान दर दिलेला असून जेनेरीक औषधे व इतर साहित्य तसेच ब्रॅन्डेड औषधे व इतर साहित्यांची खरेदी खात्याकडील आवश्यकतेनुसार व मागणीनुसार दैनंदिन स्वरूपात करण्यात येणार असल्यामुळे दोन्ही निविदाधारकांची खरेदी रक्कम निश्चित स्वरूपात नमुद करता येत नाही तथापि रक्कम रूपये ४,८०,००,०००/– ( अक्षरी रक्कम रूपये चार कोटी ऐंशी लाख फक्त ) पर्यंत जेनेरीक औषधे व इतर साहित्य तसेच ब्रॅन्डेड औषधे व इतर साहित्यांची श्रीराम डिस्ट्रीब्युटस व नरेंद्र मेडिकल्स यांचेकडून खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या दोन अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१५५ दि.७/७/२०२० चे पत्र.

| | |
|---|---|
| अर्थशिर्षक सन २०२०–२१ | अर्थशिर्षक सन २०२०–२१ |
| RE17F 153 A | RE17F 153 B |
| औषधे उपकरणी व साहित्य वगैरे | औषधे उपकरणी व साहित्य वगैरे |
| अ१.मनपा सभासदांसाठी | अ२.मनपा सेवकांसाठी |
| मान्य तरतुद रक्कम रूपये २,८०,००,०००/– | मान्य तरतुद रक्कम रूपये ६,५०,००,०००/– |
| पैकी र.रु.८०,००,०००/– | पैकी र.रु.४,००,००,०००/– |

विषय क्रमांक :– २८१ त्वर्य

आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय योजनेअंतर्गत परवानाधारक औषधे विक्रेत्याकडून दैनंदिन स्वरूपात औषधे व इतर साहित्य खरेदी करणे ( टेंडर क्रमांक ८ सन २०२० –२१ ) कामी निविदा मागविण्यात आली असता एकुण तीन निविदाधारकांनी त्यांच्या निविदा सादर केलेल्या असून पात्र दोन निविदाधारकांच्या दरांच्या तक्त्याचे अवलोकन केले असता श्रीराम डिस्ट्रीब्युटस व नरेंद्र मेडिकल्स या दोन निविदाधारकांनी जेनेरीक औषधांच्या व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर **५२.३०%** व **बॅन्डेड** औषधांच्या व इतर साहित्यांच्या छापील किंमतीवर **२१.६०%** इतका डिस्काउंट (सूट) दर जीएसटी करासहित एकसमान दर दिलेला असून जेनेरीक औषधे व इतर साहित्य तसेच ब्रॅन्डेड औषधे व इतर साहित्यांची खरेदी खात्याकडील आवश्यकतेनुसार व

मागणीनुसार दैनंदिन स्वरूपात करण्यात येणार असल्यामुळे दोन्ही निविदाधारकांची खरेदी रक्कम निश्चित स्वरूपात नमुद करता येत नाही तथापि रक्कम रूपये ३,००,००,०००/- (अक्षरी रक्कम रूपये तीन कोटी फक्त) पर्यंत जेनेरीक औषधे व इतर साहित्य तसेच ब्रॅन्डेड औषधे व इतर साहित्यांची श्रीराम डिस्ट्रीब्युटस व नरेंद्र मेडिकल्स यांचेकडून खरेदी करणेस, त्यांच्याशी आवश्यक तो करार करणेस आणि खाली नमुद केलेल्या अर्थशिर्षकावर बिलांची रक्कम खर्ची टाकून त्यांचे बिल अदा करण्यास मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१५६ दि.७/७/२०२० चे पत्र.

अर्थशिर्षक सन २०२०-२१

RE17F 141

आर्थिक दुर्बल गटासाठी आरोग्य सहाय योजनेअंतर्गत औषधे खरेदी.

मान्य तरतूद रक्कम रूपये ७,५०,००,०००/- पैकी र.रु.३,००,००,०००/-

**विषय क्रमांक :- २८२ त्वर्य**

आरोग्य खाते किटक प्रतीबंधक विभागासाठी सायफ्ल्यूथ्रीन १०% डब्लू.पी. खरेदी करणे (बी-१ पध्दतीने) कामी निविदा मागविण्यात आली असता आलेल्या तीन निविदाधारकांपैकी सर्वात कमी दर देणारे निविदाधारक मे.एस.के.सेल्स, पुणे यांचेकडून एकूण १००० किलो औषधाची र.रुपये ४८,१३,२१७=२० (सर्व करांसह) पर्यंत खरेदी करण्यास त्यासाठी त्यांचेशी करारनामा करणेस त्यापोटी होणारे बिल सन २०२०-२१ (RE17F 114) ५, जंतुनाशक विषारी औषधे ख.साथींचा बंदोबस्त या अर्थशिर्षकावर खर्ची टाकणेस मान्यता देण्याबाबत मा.अति.महा.आयुक्त(ज) यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१५७ दि.७/७/२०२० चे पत्र.

**विषय क्रमांक :- २८३ त्वर्य**

मा.सौ.वृषाली चौधरी व मा.दिलिप वेडेपाटील यांचे दि.२/७/२०२० चे पत्र

पुणे महानगरपालिकेतील मध्य वस्ती व उपनगरीय भागामध्ये बऱ्याच इमारतींचा कर भरणा पुर्ण भरलेला नाही. दंड आकारणीमुळे थकबाकी खुपच झालेली आहे. त्यामुळे जर आपण अभय योजना आणली व काही प्रमाणात थकबाकी व्याजात सुट दिली तर बऱ्याच जणांची थकबाकी मोठया प्रमाणात वसूल होवू शकते आणि सुमारे दिड ते दोन हजार कोटी रुपये महानगरपालिकेच्या तिजोरीत जमा होवू शकतात. तरी पुणे महानगरपालिकेतर्फे कर आकारणीसाठी अभय योजना चालू करावी.

त्याचबरोबर नविन ११ गावे आणि २००५ मधील २३ गावे यामध्ये बऱ्याच गावांमध्ये बरीच अशी अनधिकृत बांधकामे मोठया प्रमाणात झालेली आहेत तरी या बांधकामांना नियमित करणेसाठी काही ठराविक रक्कम आकारुन गुंठेवारी पध्दत जर चालू केली तर महानगरपालिकेला मोठा महसूल मिळणार आहे आणि कर आकारणी देखील वाढणार आहे. तरी गुंठेवारी योजना व अभय योजना या योजनांमुळे महानगरपालिकेच्या उत्पन्नात मोठया प्रमाणात वाढ होवून आता कोरोना रोगामुळे जी आर्थिक परिस्थिती पुणे महानगरपालिकेवर ओढावलेली आहे त्यातुन पुणे महानगरपालिकेला मोठया प्रमाणात दिलासा मिळू शकेल.

**विषय क्रमांक :- २८४ त्वर्य**

मा.सौ.चाँदबी नदाफ यांचे दि.२/७/२०२० चे पत्र

कोरोनाच्या पार्श्वभूमीवर सार्वजनिक शौचालय दिवसातून ५ वेळा साफ करणे आवश्यक आहे. सध्या लॉकडाऊनमुळे नागरिकांचे उत्पन्न थांबले आहे. सार्वजनिक शौचालयाचा वापर करताना सेवाशुल्क आकारले जात होते. सद्यस्थितीत लॉकडाऊनच्या परिस्थितीपासून नागरिकांकडून सेवाशुल्क भरले जात नाहीत, ही वस्तुस्थिती आहे. परंतू कोरोनाचा प्रादुर्भाव थांबविणेसाठी शौचालयाची देखरेख व देखभाल करणारे केअरटेकर यांना शौचालय साफ ठेवणे बंधनकारक आहे. सबब पुणे महानगरपालिकेडून कोरोनाचा प्रादुर्भाव संपेपर्यंत सार्वजनिक शौचालयाची साफसफाई करणेसाठी केअर टेकर यांना मानधन देणेबाबत कार्यवाही व्हावी.

विषय क्रमांक :- २८५ त्वर्य
मा.प्रमोद ओसवाल यांचे दि.७/७/२०२० चे पत्र

मे.मॅप्स ग्लोबल सिव्हील टेक प्रा.लि., २०१/२०२ दुसरा मजला, अनुराव हाईट्स, स.नं. १२९/१ सृष्टी पार्क, बाणेर, बालेवाडी रोड, बाणेर - ४११ ०४५ यांना रस्ते व पुलांच्या कामाचा अनुभव असून त्यांचा मनपाच्या पॅनेलवर रस्ते व पुलांच्या कामासाठी रोड व ब्रिज कॅटेगरी ३ मध्ये समाविष्ट करण्यास मान्यता देण्यात यावी.

विषय क्रमांक :- २८६ त्वर्य

**आरोग्य विभागांतर्गत विविध संवर्गातील पदांची सेवा सहा महिने करारपद्धतीने घेणेसाठी** मान्यता देण्यात आलेली असून सदरची बाब अवलोकनार्थ सादर केल्याची नोंद घेण्याबाबत मा.महा.आयुक्त यांचे जा.क्र. मआ/आरोग्य/१५२ दि.१/७/२०२० चे पत्र.

सुनिल पारखी
नगरसचिव,
पुणे महानगरपालिका.